# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर केलेला शोध - आराखडा

**-: संशोधन - विषय :-**

**भारतातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीतील काशीरामजी यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास**

**- संशोधक -**
**प्रशांत पालकर**

**मार्गदर्शक -**
प्रा.डॉ.सावंत यु.एस.
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी)
प्रपाठक व विभाग प्रमुख,
यशवंत महाविद्यालय नांदेड,

जुन २०१७

# मा. कांशिरामजी यांचे भारतातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीतील योगदान : एक चिकित्सक अभ्यास १९५७ ते २००६

**प्रस्तावना :**वर्णव्यवस्थेमुळे भारतात हजारो जातीची निर्मिती झाली. जाती व्यवस्थेमुळे काही जातींना जन्मतः मान, सन्मान, संधी, उच्च दर्जा प्राप्त झाला. तर काही जातींना जन्मतः अवमान, अवहेलना व हिनदर्जा देण्यात आला. परिणामतः भारतीय समाज रचनेत बंधुभाव दुर्मिळ झाला त्यामुळे समतेचे, न्यायाचे तत्व जाणीवपुर्वक नाकारले गेले. भारतातील ब्रिटीश राजवटीमुळे व कार्यामुळे शिक्षण बहुजनांसाठी खुले झाले. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने नाकारलेले शिक्षण मागासजातींना मिळू लागले. त्यामुळे त्यांच्यात चेतना व आत्मसन्मानाची भावना जागृत झाली. त्यामुळे बहुजनांचे क्रांतीदूत राष्ट्रपिता ज्योतिराव फुलेंचा उदय झाला. फुलेंनी ब्राम्हणवादाच्या व चातुर्वर्ण्य समाज व्यवस्थेच्या विरोधात १८४८ ते १८९० या कालखंडात अखंड संघर्ष केला. चातुर्वर्ण्याची चौकट उध्वस्त करुन समता, बंधूता व सामाजिक न्याय आणि बौध्दिक स्वातंत्र या तत्वावर आधारलेली बहुजन हिताय, बहुजन सुखाय समाज रचना फुलेंना स्थापायची होती. बहूजन समाजाच्या उध्दारासाठी फुलेंनी ४२ वर्षापर्यत संघर्ष केला. त्यामुळे त्यातून एक समाज परिवर्तनाला दिशा देणारी विचारधारा विकसित झाली. पुढे २४ सप्टेंबर १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना करुन ब्राम्हण शाहीला सुरुंग लावले आणि ब्राम्हण वादाच्या धार्मिक मिरासदारीला वटणीवर आणले.

शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे बहुजन समाजाचा वर्ग, अंधश्रध्दा, कर्मकांड यामध्ये गुरफुटून गेला होता. शुद्र, अतिशुद्र समजला जाणारा समाज पशुवत जीवन जगत होता. त्यास स्पर्श करणेही गुन्हा समजले जाई. देशभरातून या विखुरलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी त्याच्यातील न्युनगंड भावना दूर करण्यासाठी व संपूर्ण समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक एकतेची भाषा रुजविण्यासाठी देशभरातून ठिक ठिकाणी महापुरुष आपआपल्या परीने आंदोलन करीत होती. फुले यांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ शाहू राजांनी चालवली. शाहूने सत्येशाधक समाजाला भक्कम आधार देवून फुलेंचे स्वप्न साकारण्याचा प्रयत्न केला. १९०२ मध्ये बहूजन

समाजाला ५० टक्के आरक्षण देऊन आरक्षण धोरणाचे जनक बनण्याचा गौरव शाहूंना जातो. शाहूंनी कमालीचे धैर्य दाखविले हे इतिहासाला मान्य करावे लागले. शाहूंनी १८९४-१९२२ या २८ वर्षाच्या कालखंडात फुलेंना अपेक्षित असणारे सामाजिक परिवर्तनाचे कार्य अत्यंत प्रतिकुल परिस्थिती असून सुध्दा ध्येय निष्ठेने आणि बहुजन हिताय, बहुजन सुखाच्या तत्वप्रणालीला अनुसरुन केले. राजश्री चा समतेचा लढा दक्षिण भारतात पेरियार याने पुढे नेला आणि राष्ट्रीय स्तरावर या परिवर्तनवादी लढयाचे नेतृत्व डॉ.आंबेडकर यांनी केले. शाहूंचा वारसा डॉ.आंबेडकरांनी १९२० ते १९५६ या ३६ वर्षाच्या कालखंडात कार्यक्षमतेने चालवून बहुजनांचे हक्क कायदयाने सुरक्षित करण्यात यश संपादन केले.

विसाव्या शतकाच्या ७ व्या दशकात डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा आचाराचा वारसा स्विकारुन, गटबाजीच्या दलदलीत आडकलेल्या प्रज्ञासूर्याच्या रथाला गतिमान करण्याचा संकल्प करुन न थांबता त्याला कृतिशील कार्याची जोड देत त्याला गतिमान करण्याची जबाबदारी डॉ.आंबेडकराच्या पश्चात त्याचा शिष्योत्तम असलेल्या बहुजन नायक कांशीरामजीने पार पाडली आणि ते प्रज्ञासुर्याच्या रथाचे सारथी बनले.

कांशीरामजीची वैचारिक जडण-घडण ही बुध्द-फुले-शाहू-पेरियार नारायण गुरु-आंबेडकर या परिवर्तनाला जन्म देणाऱ्या महापुरुषांच्या विचारातुन तसेच त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यातून निर्माण झाली होती. कांशीरामजीनी महापुरुषांच्या विचारावर आणि कार्यावर आधारित आपल्या चळवळीची बैठक आणि रणनिती ठरविली होती. प्रस्तुतच्या प्रबंधामध्ये त्याची मिमांसा केली आहे.

समतामुलक समाजरचना हे कांशीरामजीच्या चळवळीचे ध्येय होते. "जातीनिर्मूलन" या ग्रंथात डॉ.आंबेडकरानी जातीव्यवस्थेचे केलेले विच्छेदन कांशीरामजीना आपली चळवळ सक्षमपणे उभी करण्यास महत्वाचे मार्गदर्शक ठरले. १९६३ ते १९६५ हया कालखंडात डॉ.आंबेडकराच्या विचार प्रणाली तसेच चळवळीला त्यांची रणनिती समजून घेण्याचा प्रयत्न

केला. त्यासाठी भारतामध्ये अनेक दौरे काढले. तसेच बहुजन समाजाच्या स्थितीचे अवलोकन केले.

१९७१ मध्ये Pay Back to Society Pune या ठिकाणी स्थापना केली आणि शासकीय कर्मचाऱ्यांना संघटित करुन आंबेडकरी चळवळीच्या प्रवाहात सामील करुन भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला एक नवी दिशा आणि ताकद निर्माण केली. त्यानंतर ८ ऑगस्ट १९८१ BRC व ६ डिसेंबर १९७८ मध्ये BAMCEF ची स्थापना दिल्ली येथे केली. फुले-शाहू आंबेडकर या महापुरुषाच्या परिवर्तनवादी क्रांतिकारी विचारांच्या ताकदीचा योग्य वापर कसा करावयाचा हे इंगित शोधणाऱ्या कांशीरामजीनी दलित हा शब्द भिरकावून देऊन "बहुजन समाज" हया व्यापकता दर्शविणाऱ्या संकल्पनेचा स्विकार करुन चळवळीला व्यापकता देण्याचे कार्य केले. कांशीरामजीने आयुष्यभर फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेचा बहुजन समाजात प्रसार व प्रचार केला आणि कॅडरबेस कार्यकर्त्यांचा एक मोठा प्रवाह कृतिशील केला. थोडक्यात भारतातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीत कांशीरामजीचे अतिशय महत्वाचे योगदान असल्याचे सिध्द होते त्याचा नेमका वेध प्रस्तुतच्या प्रबंधात मांडला आहे. कांशीरामजीचे वैचारिक तत्वज्ञान हे बुध्दीवादी, सामाजिक लोकशाहीवादी, आणि सामाजिक परिवर्तनवादी आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे आहे. कांशीरामजी हे सामाजिक परिवर्तन, धार्मिक परिवर्तन, व सांस्कृतिक परिवर्तनाचे बहुजन नायक आहेत.

१९६३ पासून आंबेडकरी चळवळीला सत्तापरिवर्तनाच्या पार्श्वभुमीवर एक नवे नेतृत्व उभारले ते म्हणजे कांशीराम होय. फुले - आंबेडकरी यांच्या अखंडीत सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाला काशीराम यांनी नव उन्मेषाचा उजाळा दिला. महाराष्ट्रातून त्यांना यश आले नाही. त्यामुळे त्यांनी उत्तर भारतात आंबेडकरवादाची पेरणी केली त्या ठिकाणी त्यांना भरपुर यश आले. उत्तर भारतात सत्तापरिवर्तनाच्या दिशेने टाकलेले यशस्वी पाऊल बहुजन समाजात नवा

आत्मविश्वास निर्माण करण्यास कारणीभूत ठरले. त्याचा आढावा सदरच्य प्रबंधात मांडला आहे.

कांशीराम हे धुरंधर राजकारणी तसेच स्वतंत्र विचारसरणीचे नेते होते. त्याची वैचारिक बैठक भक्कम असल्याचा प्रत्यय येतो. ते विज्ञानवादी असलेले सामाजिक विचारवंत दिसतात. काशीरामजीने केलेले सामाजिक परिवर्तनाचे कार्य आणि त्यांनी देशातील बहुजनाच्या अस्तित्वाचे मांडलेले स्वरुप यावरुन स्पष्ट होते. कांशीरामजीचे कार्य त्यांच्या विविध प्रकारच्या कार्याचे स्वरुप व चळवळीद्वारे समजून घेणे आवश्यक वाटते. यामध्ये राजकीय चळवळ, धार्मिक चळवळ, वृत्तपत्राची चळवळ, जातीनिर्मुलनाची चळवळ यांचा समावेश होतो. कांशीरामजीने चालविलेल्या सामाजिक चळवळीचे नव्हे तर त्यांच्या जीवनाची मूळ उदिद्ष्ट साध्य करण्यासाठी "थिकटॅक" चे कार्य परिणामकारक ठरल्याचे दिसून येते केडरकॅम्प Think Tank चे अपत्य मानले जाते.

१९५६ नंतर अत्यंत ठोस आणि परिणामकारक चळवळीची यशात्मक मांडणी करणारे एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे कांशीराम होय. बदलत्या संदर्भात देशातील आंबेडकरी चळवळीला व्यापक, यशस्वी आणि गतिमान करण्याचे परिर्वनवादी चळवळीत आंबेडकरी विचारांना केंद्रस्थानी मांडण्याचे चिंतन आणि तत्वज्ञान हे कांशीरामजी यांचे योगदान नक्कीच ऐतिहासिक आहे. यांची दखल घेतल्याशिवाय चळवळीच्या विद्यार्थ्याला पुढे जाता येणार नाही. डॉ.आंबेडकराच्या महापरिनिर्वाणानंतर देशभर एकजिनशी बनलेली आणि एकवटलेली आंबेडकरी परिवर्तनवादी चळवळ खंडित झाली होती. भाषा, प्रांत, स्थानिक जातिनिहाय आणि नेतृत्व यामध्ये जखडल्यामुळे वाताहत झाली. त्यामुळे देशभर चळवळ प्रांतिक स्वरुपाची बनली. अशा प्रांतिक ओळख झालेल्या भारतातील परिवर्तनवादी चळवळीला पुनःश्च राष्ट्रीय स्वरुप देण्याचे तुटलेल्यांना जोडण्याचे बेजोड कर्तृत्व हे नक्कीच कांशीरामजी यांचे आहे.

सत्तेपासून वंचित राहिलेल्या ब्राम्हणेत्तर शुद्रानिशुद्र जातींना सत्ता मिळवून देण्याचे आश्वासन कांशीरामजीचा बहुजनवाद देतो. त्यांची पूर्तता धनगर, वंजारी, बंजारी, मातंग,

चर्मकार, माळी, कोळी अशा बहुजन वर्गातील जातींना एकत्र आणून सामाजिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न कांशीरामजीने केला. तसेच बहुजनवाद संकल्पनेचा सिध्दांत कांशीरामजीने मांडला. पिडीत-शोषित समाजाची अराजकीयमुळे निर्माण करुन ती मजबुत करण्याचे कार्य कांशीरामजीने केले. दीनदुबळया, दुःखी लाचार, गुलाम लोकांच्या मनात स्वाभीमानाची ज्योत कांशीरामजी पेटवितात. त्यांना मनुवादी अन्यायाविरुध्द संघर्ष करावयास लावतात. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्यायाची पेरणी करतात.

बहुजनवादी चळवळीची मांडणी करतांना, भारतातील बहुजन समाजात राजकीय सत्तेच्या सहभागाने व्यापक सामाजिक परिवर्तन घडवून आणता येईल व डॉ.आंबेडकर प्रणीत सामाजिक प्रश्नांना प्राधान्य दिल्याशिवाय बहुजनाचे खरे प्रश्न सुटणार नाहीत असे कांशीरामजी यांना वाटते. राजकीय सत्तेला ते साध्य मानत नाहीत. तर राजकीय सत्ता हे सामाजिक परिवर्तनासाठी साधन मानतात.

१९५६ नंतर आंबेडकरी चळवळ सिमीत झाली होती. त्या मृतवत होत चालेल्या चळवळीत जर कोणी प्राण फुंकला असेलतर ते कांशीरामजी होत. फुले, शाहू, आंबेडकरांना संबंध भारतातील बहुजन समाजापर्यत पोहचविण्याचे ऐतिहासिक कार्य मा.काशिरामजीचे आहे. डॉ.आंबेडकर यांच्या नंतर स्थिरावलेल्या समाज परिवर्तनाच्या चळवळीला गतिमान करुन जातीविरहीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्वतः बहुजन समाजाप्रती समर्पित केले. स्थिरावलेल्या चळवळीचे वैज्ञानिक विश्लेषण करुन कालबध्द कृती कार्यक्रम त्यांनी आखला त्याचा नेमका आढावा प्रस्तुतच्या प्रबंधात मांडला आहे.

फुले, शाहू, आंबेडकर यांच्या बरोबर पेरियार, बिरसामुंडा, आण्णाभाऊ साठे, नारायण गुरु इ.सर्व बहुजन महापुरुषांना एकाच कडीत जोडून कांशीरामजीने मनुवादा विरुध्दचा संघर्ष तळागाळा पर्यत पोहचविला आणि आंबेडकरी चळवळीचा विकास केला तिला प्रवाही बनविले व नवे आयाम प्राप्त करुन दिले. फुले, शाहू, आंबेडकरांचा १०८ वर्षाचा संघर्ष १५० वर्षाचा

केला. कांशीरामजीचा जीवन मार्ग विविध अंगी आहे तसेच तत्वज्ञानाचा अन्वयार्थ लावणारा आहे. त्याची भाषा वस्तुनिष्ट व विचार वाहक आहे. त्याचे स्वरुप स्पष्ट व अर्थवादी आहे. तत्वज्ञानी मानवी समस्याची चर्चा करतो. त्या समस्याची उत्तरे शोधताना मानवी समाजाचे प्रबोधनही करतो. विचारवंत आणि त्यांच्या विचारांची महत्ता हि त्याच्या व्यावहारिकतेत स्वतंत्रेत, मुलभुततेत तर्क शुध्दतेत, वैश्विकतेत आणि व्यापकतेत असते. या पार्श्वभुमीवर कांशीरामजीचे विचार व तत्वज्ञान या कसोटयांना उतरणारे आहे.

मा.कांशीरामजीचे संपुर्ण क्रांतीचे तत्वज्ञान हे निरिश्वरवादी असून ते तर्कनिष्ठ, विज्ञाननिष्ट आहे. त्याचबरोबर ते मानवतेची प्रतिष्ठा मानते. दास्य, वर्णव्यवस्था, जाती व्यवस्था, नाकारते तसेच ते शोषणालाही विरोध करते. शेवटी काशीरामजी हे फुले-आंबेडकरी विचारधारेलाच समाज परिवर्तनाचे साधन मानतात.

मा.कांशीरामजीचे सामाजिक परिवर्तनाचे विचार हे बहुजन समाजाच्या पुनर्बांधणीच्या संदर्भात मांडलेले दिसतात. इतकेच नव्हे तर सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने मांडलेले विचार हे मुलगामी स्वरुपाचे आहेत. केवळ रुढी परंपरेमध्ये परिवर्तन घडवून आणणे इतका त्यांचा मर्यादित दृष्टीकोन नव्हता. कांशीरामजीच्या परिवर्तनवादी विचाराचे मुल्यांकन केल्यास त्याचे सामाजिक परिवर्तना बाबतचे योगदान संपुर्ण बहुजन समाजाचे अभ्युदय घडवून आणणारे आहे हे स्पष्ट होते. सदरचा प्रबंध म्हणजे कांशीरामजीच्या जीवनाचा व त्यांनी उभा केलेल्या बहुजन संघर्षाचा इतिहास आहे. साधारणतः या विषयाचा अभ्यास सात प्रकरणात केला आहे.

**१) विषय निवड :** डॉ.आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर आंबेडकरी चळवळ सिमित झाली होती. तिला भारतव्यापी करण्याचे श्रेय मा.कांशीरामजीना द्यावे लागेल. १९७८ मध्ये बामसेफ व १९८१ मध्ये डीएस४ हया अराजकिय संघटना स्थापन करुन आपल्या चळवळीची भूमिका व विचार सरणी भारतातील बहुजन समाजामध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला या संघटनेचा अभ्यास मा.कांशीरामजीच्या भारतातील परिवर्तनवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभुमी म्हणुन आवश्यक ठरतो.

बहुजन-दलित चळवळीमध्ये मा.कांशिरामजीचे मोठे योगदान असल्याचे स्पष्ट होते. म्हणून मा.काशिरामजीचे भारतातील परिवर्तनवादी चळवळीतील योगदानाबाबत असलेली उत्सुकता दुर करण्याच्या उदद्शाने व सामाजिक इतिहास लेखनाची पुनर्माडणी करण्याच्या उदद्शाने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**२) संशोधनाची उदिद्ष्ठे :**

१) भारतातील परिवर्तनवादी चळवळी व मा.कांशीरामजीच्या संबंधाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२) सामाजिक इतिहास लेखनात महत्वपुर्ण नोंद करणे.

३) मा.कांशीरामजी प्रणीत भारतातील दलित-बहुजन चळवळीच्या निर्मिती प्रक्रियेचा अभ्यास करणे.

४) मा.काशीरामजीच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक धोरणांचा अभ्यास करणे.

५) मा.कांशीरामजीच्या विचारकार्याचा अभ्यास करणे.

६) मा.कांशीरामजीच्या परिवर्तनवादी चळवळीचा भारतातील दलित-बहुजनांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनांत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

७) मा.कांशीरामजीच्या गैरराजकीय चळवळीचा चिकित्सक अभ्यास करणे.

**३) संशोधनाची गृहितके :**

१. मा.काशीरामजी हे परिवर्तनवादी होते.

२. मा.कांशीरामजी हे प्रखर आंबेडकरवादी होते.

३. भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत मा.कांशीरामजी ने निर्माण केलेल्या बामसेफ व डीएस ४ या अराजकीय संघटनांची महत्वपुर्ण भूमिका होती.

४. मा.कांशीरामजी ने बहुजनांमध्ये आत्मसन्मानाची भावना जागृत केली होती.

५. मा.कांशीरामजीने भारतामध्ये सामाजिक चळवळ उभारुण दलित बहुजनांच्या विकासाला चालना दिली होती.

६. मा.काशीरामजीच्या दलित बहुजन चळवळीने भारतातील बहुजन वर्गात एक नवीन उमेद निर्माण झाली.

७. मा.कांशीरामजी यांची बहुजन चळवळ ही भारतातील एक सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाला गती देणारी म्हणून महत्वाची व प्रभावी ठरली आहे.

८. मा.कांशीरामजीच्या चळवळीस दलित बहुजनांचा सक्रिय पांठिबा होता.

९. भारतातील दलित बहुजनउध्दारक कार्यामध्ये मा.कांशीरामजीची महत्वपुर्ण भूमिका आहे.

१०. मा.कांशीरामजी ने सामाजिक व राजकीय धार्मिक सुधारणा करुन पुरोगामी विचारांची पेरणी केली.

**४) संशोधनाची कार्यपध्दती :**

प्रस्तुत विषयांची मांडणी करताना प्रामुख्याने संशोधन पध्दतीमध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा आणि वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे त्याच प्रमाणे संदर्भ पध्दत, प्रश्नावली, मुलाखत व सर्वेक्षण या पध्दतीचा वापर करुन सदरचे संशोधन पुर्ण केले जाईल.

**५) साधन चिकित्सा :**

प्रस्तुतच्या संशोानासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला जाईल. प्राथमिक साधनामध्ये मा.कांशीरामजी चे बहुजन नायकांचे अंक, त्यांच्या भाषनाचे खंड, बहुजन उत्थान, श्रमिक साहित्य, बहुजन संदेश, बहुजन टाईम्स, ऑप्रेस्ड इंडियन, धर्मयुग, चमचायुग, बामसेफ परिचय, दलित साहित्य, बहुजन एकता, दलित आर्थिक उत्थान, किसान साहित्य, शोषित

साहित्य, बामसेफ बुलेटिन, अनटचेबल इंडिया, बामसेफ संडेसिरिज इ. साधनांचा वापर केला जाईल तर दुय्यम साधनामध्ये प्रस्तुत विषयावरील महत्वाचे ग्रंथ नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ इ. साधनांचा वापर करुन सदरचे संशोधन पुर्ण केले जाईल.

**६) संशोधनाची स्थल व कालमर्यादा :**

या ठिकाणी संशोधन प्रबंधाचे स्थल व कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. येथे १९५७ ते २००६ या कालखंडातील कांशीरामजी यांच्या भारतातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीचा अभ्यास अभिप्रेत आहे.

**७) संशोधन समस्या :**

मा.कांशीरामजीच्या भारतातील परिवर्तनवादी चळवळीचा चिकित्सक अभ्यास करणे व परिणामाचे विश्लेषण करणे हि या संशोधनाची मुलभुत समस्या आहे. या समस्येचा चिकित्सक अभ्यास करुन मा.कांशीरामजीच्या भारतातील परिवर्तनवादी चळवळीच्या वाटचालीचा वस्तूनिष्ठ आढावा सदरच्या संशोधनात मांडला आहे.

**८) प्रकरण योजना :**

प्रस्तुत संशोधन प्रबंध ७ प्रकरणात विभागला असून, प्रबंधाच्या स्वरूपाच्या आकलणासाठी त्यातील आशयाचे प्रकरणनिहाय थोडक्यात पुढिल प्रमाणे मांडण्यात आले आहे.

**प्रकरण १ ले कांशीरामजी यांचे राजकीय चळवळीतील योगदान :**

कांशीरामजी हे २० व्या शतकाच्या ७ व्या दशकातील सामाजिक परिवर्तन, राजकीय परिवर्तन व सांस्कृतिक परिवर्तनाच्या संघर्षाचे बहुजन नायक आहेत. कांशीरामजीचे विचार बहुजन समाजाच्या पूनर्बाधणी संदर्भात मांडलेले दिसतात.

प्रस्तुत प्रकरणात कांशीरामजीच्या राजकीय आंदोलनाच्या उदयाची पार्श्वभुमी, बहुजन समाज पक्षांची स्थापना, बसपाची ध्येय व धोरणे त्यांच्या चळवळीची राजकीय वाटचाल, चळवळीची रचना व स्वरुप, चळवळीची विचारधारा, भारतीय समाजव्यवस्थेचे रेखाचित्र, बसपाची विविध निवडणुकीतील पक्षाची कामगिरी, शोषिका विरुध्द शोषितांची युती, तसेच सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक मुक्ती चळवळ इ.संकल्पनाचा चिकित्सक अभ्यास केला जाईल.

कांशीरामजीने आपल्या महाराष्ट्राच्या वास्तव्यात आर.पी.आय ची ससेहोलपट प्रत्यक्षपणे पाहिली होती. डॉ.आंबेडकराच्या महानिर्वाणानंतर पक्ष कसा दुभंगला गेला, त्याचे विदारकचित्र त्यांच्या डोळयासमोर होते. त्याचप्रमाणे बामसेफच्या वाटचालीत येथील जातीय राजकारणाचाही जवळुन परिचय आला होता. या जातीय राजकारणाचा सामना करण्यासाठी डीएस-४ या संघटनेची १९८१ मध्ये स्थापना केली. याच संघटनेने पक्षाचा पाया प्रशस्त केला. पुढे बहुजनाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ते १४ एप्रिल १९८४ ला बहुजन पक्षाची स्थापना करतात. त्यांच्या आंदोलनातील वर्ग हा सुशिक्षित होता. आंबेडकरी विचाराने प्रभावित होऊन जागृत झाला होता. हाच वर्ग चळवळीचा कणा बनला. सदरच्या प्रकरणात कांशीरामजीच्या राजकीय योगदानाची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे.

कांशीमराजीने बहुजन समाज पक्ष हे नाव विचारपूर्वक निवडले होते. बहुजन समाजाला राज्यकर्ते म्हणून पुढे आणणे, असा व्यापक उददेश बाळगुण त्यांनी बसपाची स्थापना केली. तसेच त्याच्या राजकीय चळवळीची वाटचाल बहुजनवादी राजकारणाच्या दिशेने झालेली दिसुन येते. काशीरामजी बसपाची विचारधारा हि फुले-शाहु पेरियान आंबेडकर याच्या विचारधारेवर

आधारित उभी केलेली दिसते. उत्तर प्रदेशात जे कार्य केले त्याचाही आढावा प्रस्तुतच्या प्रकरणात घेतला जाईल. एकंदरित त्याच्या राजकीय विचारधारेची कार्याची एकूणच त्यांच्या आंदोलनाची मिमांसा करण्यात आली आहे.

**प्रकरण २ रे मा.कांशीरामजीचे वृत्तपत्र व प्रसारमाध्यमाच्या चळवळीतील योगदान :**

कोणत्याही चळवळीचे प्रेस आणि प्रकाशने हे अविभाज्य अंग असते. चळवळीवर होणारे हल्ले थांबविणे, चळवळीचे संरक्षण करणे, प्रतिपक्षावर हल्ले करुन त्यांना नामोहरन करणे, अन्याय-अत्याचाराला वाचा फोडणे, लेखकाला प्रोत्साहन देणे, अशा अनेक कारणासाठी कांशीरामजी वृत्तपत्र व प्रसारमाध्यमाची चळवळ चालु करतात. वेगवेगळया भाषेत वृत्तपत्रे असल्याशिवाय समाजाजागृती करणे व संघटनाची उदिद्ष्टये समजावुन सांगणे शक्य नव्हते त्यामुळे त्यांनी डॉ.आंबेडकराच्या वृत्तपत्रे विषयीच्या चळवळीला अनुसरुन स्वत:ची वृत्तपत्रे चालु केली.

प्रसारमाध्यमाची गरज का आहे ? यासाठी १ जुन १९७२ ला The untouchable India या मॅगजिनमध्ये संपादित लेख प्रकाशित करुन महत्व प्रतिपादन करतात. जातीयवादी वृत्तपत्रे बहुजन आदिवासी अत्याचाराची अनुउल्लेखाने मुस्कटदाबी कशी केली जाते. त्याचे स्पष्टीकरण करतात. १९७५ मध्ये बामसेफ परिचय हा ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशित केला. यामध्ये बामसेफचा उद्देश, ध्येय, धोरण, इतिहास, या बाबीचा उल्लेख केला आहे. त्याचाही सविस्तर आढावा या प्रकरणात घेतला आहे. १४ एप्रिल १९७९ रोजी दि ऑप्रेस्ड इंडिया हे इंग्रजी मासिक चालु केले. १९७६ मध्ये बामसेफ बुलेटीन, १९८० मध्ये बहुजन नायक, बहुजन संघटक, बहुजन टाईम्स १९८४ मध्ये पुढे बहुजन टाईम्स इंग्रजीमध्ये, बहुजन नायक बंगाली, पंजाबी, गुजराथी, उर्दु, ओरिसा, इ.भाषेतुन चालु केले होते. बहुजन साहित्य, दलित साहित्य, बहुजन एकता, दलित आर्थिक उत्थान, इकॉनॉमिक्स अपसर्ज अशा प्रकारे कांशीरामजीने

देशभरातुन वृत्तपत्रे चालु करुन चळवळीचा विस्तार बहुजनापर्यंत केला. त्यांचे नियतकालिके बहुजनयुक्त शब्दाने प्रसिध्द केलेले दिसतात.

सुरुवातीस The Untouchable India, Oppressed India त्यानंतर बहुजन मालिका हे चळवळीचे विविध टप्पे दर्शविणारी नियतकालिके कांशीरामजीने चालु केली. सदर नावे त्याची चळवळ गतिमान होती. हे दर्शविणारी आहेत. पुढे भारतीय प्रेस व ब्राम्हण मिडीया, जागतिक स्तरावर वाचा फोडली, भेदाभेद विरुध्द आंतरराष्ट्रीय परिषद, संशोधन व विकास शाखा, जातीय निर्मुलन ग्रंथाचे भाषांतर बामसेफ संडेसिरीज बी.व्ही.एफ - बामसेफ स्वंयसेवक संघ मागासवर्गीयामध्ये वैचारिक क्षेत्रातील लोकांना जोडुन घेण्याचे कार्य संडेसिरीजच्या माध्यमातुन करण्यात आले. कांशीराजीच्य चळवळीचे विविध टप्पे, प्रगती, विस्तार, गतिशीलता या नियतकालिकातुन दिसुन येते त्यामुळे चळवळीस राष्ट्रीयत्व प्राप्त झाले. त्यानंतर कांशीरामजीचे प्रभावी भाषण, प्रभावी जनसंपर्क त्यांच्या ग्रंथाचे वर्गीकरण इतर संपादन लेखन कार्ये, प्रसार माध्यमाची गरज का ? सरकारी अहवाल व त्याचा समिक्षात्मक अहवाल, अस्पृश्य शोषिताचा संवाददाता, सरकार व लोकशाहीवर वचक, इत्यादी संकल्पनाचा चिकित्सक आढावा घेण्यात येईल.

**प्रकरण ३ रे कांशीरामजी यांचे जातीय निर्मुलनातील योगदान :**

भारतातील सामाजिक परिवर्तनवादी चळवळीत कांशीरामजी यांचा एक महत्वाचा कालखंड म्हणुन ओळखला जातो. कांशीरामजीच्या उदय व कार्यामुळे खंडित झालेल्या भारतातील आंबेडकरी चळवळीला सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन प्रवाहाला नवीन दिशा मिळाली आहे. ब्राम्हणी व्यवस्थेने बहुजन समाजाला ६ हजार जातीत विभागुन ठेवले आहे. त्या विखुरलेल्य जातीना एकत्र करुन त्याच्यात बंधुभाव निर्माण करुन बहुजन समाज निर्माण करण्याचा कांशीरामजीने प्रयत्न केला. बहुजन समाजाची व्याख्या स्पष्ट करुन त्यासाठी बहुजनवादी चळवळीची मांडणी व कृती कार्यक्रम तयार केला. कांशीरामजीची चळवळ

मुल्यतः जाती निर्मुलनाची चळवळ होती. लोकसभेच्या पहिल्याच भाषणात ते जाहिर उल्लेख करतात. त्यासाठी त्यांनी राष्ट्रीय आंदोलने केलेली आढळतात. त्यामध्ये जातीतोडो समाज जोडो, समतामूलक समाजरचना यांचाही उल्लेख प्रस्तुत प्रकरणात केला जाईल वैदिक कालखंडापासुन मानव मुक्तीच्या ऐतिहासिक संघर्षाचा विचार केला असता, महापुरुषांनी केलेला संघर्ष हा गावकुसाबाहेरील माणसाच्या सहअस्तित्वाचा होता. कांशीरामजीने जातीय व्यवस्थेवर प्रहार केलेला आढळतात. तसेच मानवी मुल्यावर आधारित समताधिष्ठीत व्यवस्था ते निर्माण करतात. महापुरुषाचे विचार व कार्य मांडतांना त्यानी जीवनात केलेले लढे हे त्याच्या जीवनाचे संदर्भ असतात. त्याचे जातीविषयक विचार समजुन घेतांना त्यानी उभारलेल्या समाजक्रांतीच्या लढयाची संदर्भ लक्षात घ्यावी लागतील. थोडक्यात कांशीरामजीच्या युगप्रवर्तक कार्याचा व समाज चिंतनाचा अन्वयार्थ लावणारा आणि त्याची महत्ता मांडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत प्रकरणात भारतातील जातीयवाद एक मुलभुत समस्या, जातीच्या निर्मितीमध्ये एक विशेष उद्देश, जातीचे विशेष, जातएक दुधारी तलवार, भारतीय शरणार्थी, समतामुलक समाजरचना, मनुवादी प्रपंच, जातीच्या शिकार ६००० जाती, स्वतंत्र भारतात बहुजन निर्भर का? इत्यादी संकल्पनाचा अभ्यास केला जाईल. थोडक्यात जातीय निर्मुलन विषयक तत्वज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करुन त्यांचे वैचारिक आणि भाषीक निष्कर्षात्मक विशेष सांगितले आहेत. कांशीरामजीचे जातीनिर्मुलन विषयक वैचारिक विचार हे तात्विक स्तरावर वावरते. त्याचप्रमाणे मानवी जीवनाविषयीच्या विविध तात्विक भुमिकाचे विश्लेषण करते थोडक्यात त्यांच्या विचार विश्वाचा इत्यार्थ अत्यंत काटेकोरपणे समजावुन घेतला आहे. त्यांच्या संपुर्ण अभिव्यक्तीमागे सामाजिक उत्थानाची प्रामाणिक तळमळ आहे. अभिव्यक्तीत प्रांजळपणासोबत अनिष्ठ चालीरीती, परंपरा याविषयी चीड आहे. थोडक्यात कांशीरामजी यांची चळवळ ही सांस्कृतिक विरोधातील संघर्ष होता.

**प्रकरण ४ थे कांशीरामजी यांचे धम्म चळवळीतील योगदान :**

मा.कांशीरामजीने जरी बौध धम्माचा स्विकार केला नसला तरी ते विचार व कृति यांनी बुध्द अनुयायीच होते हे त्यांचे जीवन जगणे व त्यांचे धम्मविषयक कार्य यावरुन प्रकर्षाने जाणवते. केवळ बुध्द धम्म स्विकारला म्हणुन कोणी बुध्दाचा अनुयायी होत नाही. तर त्यासाठी बुध्दाचे तत्वज्ञान त्याचा जीवनमार्ग स्वीकारुन त्याचे अनुकरण करण्याचे नितांत गरज असते. या दृष्टिकोनातुन जर कांशीरामजीची भुमिका तपासली तर ते बौध्द अनुयायी ठरतात. त्यांनी बुध्दाची शिकवण अंगीकारुन त्याचा विचाराचा प्रसार व प्रचार संपुर्ण भारतभर केला एकुणच कांशीरामजीचे जीवन व कार्याची वाटचाल पाहिली तर ते स्वतःसाठी जगले असे कुठेच दिसत नाही. त्यांनी स्वतःचे जीवन बहुजनाच्य उत्थानासाठी समर्पित केले होते.

बुध्दाने वर्णव्यवस्था जातीव्यवस्था नाकारली कांशीरामजीनी सुध्दा वर्ण व जातीव्यवस्था नाकारली होती. त्यासाठी त्यांने जाती तोडो समाज जोडो असे अभियान चालविले होते. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षी (२००६) बौध्द धम्माची दिक्षा घेण्याची ५ लाख लोकांसह घोषणा केली होती. अशी घोषणा बुध्दाचा अनुयायीच करु शकतो.

प्रस्तुतच्या प्रकरणात १९५६ ची धम्मक्रांती, धम्मक्रांतीनंतरची वाटचाल, बौध्द भारताच्या दिशेने कांशीरामजीची वाटचाल, त्याची सांस्कृतिक चळवळ व त्याची पार्श्वभुमी, कांशीरामजीची व बौध्द धम्माची कार्ये इत्यादी संकल्पनाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. हजारो वर्षापासुन एकाच वर्णाची सांस्कृतिक वर्चस्व चालत आले आहे. त्यामुळे जीवनाच्य प्रत्येक क्षेत्रात उच्च वर्गीयाचा एकाधिकारशाही निर्माण झाली आहे. त्यामुळे येथील बहुजन आदिवासी समाज भरडला गेला आहे. म्हणुन ते उच्च वर्णीयाचे वर्चस्व संपुष्टात आणुन ते बुध्दाच्या समतेची, बंधुतेची एकुणच मानवतेच्या उत्थानाची सांस्कृतिक चळवळ उभारतात. त्यासाठी समतेच्या चळवळीत अग्रणी असलेल्या बहुजन महापुरुषांना आपल्या आंदोलनाचे प्रेरणास्त्रोत मानतात. व त्यांचे विचार संपुर्ण भारतभर पसरविण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करतात. ब्राम्हणी धर्म आपले सांस्कृतिक वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी राम मंदिराचे आंदोलन

करतात. तर दुसरीकडे कांशीरामजी हे महापुरुषांच्या विचाराचा प्रसार व प्रचार करण्यासाठी बहुजन समाजाचे मेळावे घेतात. कांशीरामजी नेहमी म्हणायचे माझ्या स्वप्नातील भारत हा सम्राट अशोकाच्या काळासारखा असेल. ज्यांच्या राज्यात समता, बंधुता होती. अशा संपन्न भारताचे स्वप्न कांशीरामजी बघत होते. पुढे ८ ऑक्टोबर १९८१ मध्ये बी.आर.सी. ची स्थापना केली. २७ फेब्रुवारी १९८२ ला दिल्लीमध्ये डॉ.आंबेडकर व बौध्द धम्म या विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली होती. यासाठी इंग्लडचे संघरक्षित व लोकमित्र उपस्थित होते. १९८१ मध्ये धम्म क्रांतीची दिशा व दशा आणि उपाय यावर नागपुर येथे धम्म परिषद आयोजित केली होती. तसेच बुध्दगया महाविहार येथे आंदोलन केले होते. सदरच्या प्रकरणात यांची अभ्यासपुर्ण मांडणी केली जाईल.

**प्रकरण ५ वे सामाजिक परिवर्तनाचे आंदोलन आणि कांशीराजी यांचे गतिमान राष्ट्रीय नेतृत्व :** सदरच्या प्रकरणात कांशीरामजीच्या चळवळीचे ध्येय, लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थव्यवस्थेत भागीदारी, कांशीरामजीच्या चळवळीचे उद्देश, चळवळीचे धोरण, स्वावलंबनातुन स्वाभिमान, मनुवाद नष्ट करणे, बहुजन समाजाची व्याख्या स्पष्ट करणे, १५% विरुध्द ८५% अशा संघर्ष उभा करणे, बहुजन समाजाला शासनकर्ती जमात बनविणे, लोकजागृती, कांशीरामजीचे राष्ट्रव्यापी आंदोलने, मुक्तीसाठी दीर्घकाळ संघर्ष, मंडल आयोगाचे आंदोलन, ओबीसीची समस्या राष्ट्रीय समस्या, सामाजिक लोकशाहीची युनिक वैशिष्टे, मातंग जागृती, धनगर परिषद, माळी परिषद, भरवसा यात्रा, सायकलमार्च, भारतव्यापी जीपमार्च, संविधान समिक्षा विरुध्द आंदोलन, आरक्षण चळवळीचा शताब्दी महोत्सव, सीरीप्रथा बंद आंदोलन, दारु भट्टी बंद करो आंदोलन, बहुजन चळवळीतील निर्माण झालेल्या घोषणा इत्यादी संकल्पनाचा अभ्यास केला जाईल. जो समाज अन्यायग्रस्त, अत्याचारग्रस्त, असतो त्याला गुलामगिरीतुन सुटका करुन घेण्यासाठी चळवळीची, परिवर्तनाची व क्रांतीची गरज असते. म्हणुन भारतातील परिवर्तनवादी मनुवादाचे बळी ८५% बहुजन समाज ज्याला चळवळीची

गरज आहे. चातुर्वर्ण्याधिष्ठित जातीव्यवस्थेने त्याला अपमानित अन्याय-अत्याचारग्रस्त, परावलंबी शोषित बनविले आहे. हा समाज म्हणजे राष्ट्रपिता फुलेच्या भाषेत शुद्रातिशुद्र ८५% लोकसंख्या असुनही सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठाविहीत बनला आहे. जातीनिर्मुलन करुन सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, लोकशाही निर्माण करणे हे आंबेडकरी ध्येय्य कांशीरामजीच्या कृतीतुन दिसुन येते. सामाजिक लोकशाहीचा सिध्दांत व व्यवहार हा सिमीत व जातीच्या चौकटीतच बंदिस्त होता. ही चौकट जागृतीमुळे विस्कटीत होऊ शकते. यांची कांशीरामजीना जाणीव असल्यामुळे आपल्या सक्षम नेतृत्वात त्यांनी अखिल भारतात फुल, शाहु, पेरियार, आंबेडकर, नारायण गुरु, यांचे सामाजिक लोकशाहीचे सिध्दांत रुजविले आणि चळवळीच्या माध्यमातुन समाज मनात जीवंत केले. बहुजन समाजाला विचार प्रवण बनविणे, आंबेडकरी चळवळ यशस्वी होऊ शकते. याविषयी बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण करणे हे कांशीरामजीच्या चळवळीचे उदद्‌श होते.

ज्या समाजाचे मुळे मजबुत नसतात त्या समाजाची चळवळ यशस्वी होत नाही. असे कांशीरामजीना वाटते. आर.पी.आय चळवळ अयशस्वी झाली कारण आंबेडकरी समाज हा मुळे नसलेला समाज आहे. डॉ.आंबेडकराच्या कार्यामुळे जे परिवर्तन झाले आहे त्यातुन ती मुळे शोधुन बळकट केली पाहिजे. म्हणुन बामसेफच्या रुपाने त्यांनी कर्मचाऱ्यांचे संघटन उभे केले त्यानंतर त्या आधारावर संघर्ष प्रवन करण्यासाठी डीएस४ हे संघटन उभे केले. अशा प्रकारे त्याने आपल्या चळवळीचे धोरण आखले होते. कांशीरामजीची विचाराची बैठकी मानवता, वस्तुनिष्ठेवर आधारित होती. त्यांचे एकदंरीत कार्य आणि विचाराचे अवलोकन केल्यास असे म्हणतात येईल की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, इत्यादी आधुनिक मुल्यांची पेरणी करण्याचे, जातीव्यवस्था ठोकरण्याचे कार्य मौलिक आहे. याबाबत डॉ.पानतावणे म्हणतात सामाजिक व्यवस्था परिवर्तनाचे कांशीरामजी यांचे चिंतन निश्चित मुलगामी मानले पाहिजेत. थोडक्यात कांशीरामजी यांच्या कार्याचा सुक्ष्म बारकावा स्वच्छपणे प्रस्तुत प्रकरणात सांगितला आहे.

**प्रकरण ६ वे मा.कांशीरामजीचा सामाजिक परिवर्तना संदर्भातील दृष्टिकोन तथा विचार प्रणाली :** विषमता प्रणित समाजव्यवस्था नाकारुन समता, बंधुता, या मानवतावादी तत्वावर आधारलेली समाजव्यवस्था त्यांना हवी होती. त्यांची विचारसरणी, वैचारिक पातळी, उच्च कोटीची होती. भविष्यातला अचुक वेध घेण्याची त्यांची दुरदृष्टी होती. ते कार्यकर्त्यांना म्हणायचे "जे लोक तुमची चळवळ तोडतील त्यांचे संघटन तोडण्याची क्षमता स्वतःच्या ठायी निर्माण करावी. स्वाभिमानाशी केव्हाच तडजोड करु नका. झुकलेल्या मानेपेक्षा तुटलेल्या मानेचा इतिहास बनतो हे विसरु नका. जे लोक तुम्हांला आडवुन भिती दाखवितात त्यांना तुमची छाती दाखवा" अशा प्रकारे सडेतोड स्वाभिमानी उदघोष देणारे कांशीरामजी हे आधुनिक भारताचे महान विचारवंत होते. भारतीय राजकारणाच्या उदयोन्मुख इतिहासामध्ये त्यांचे नांव अग्रक्रमाने लिहावे असे समर्पक आहे त्याची संपुर्ण विचारधारा आंबेडकरवादाशी प्रामाणिक राहीली आहे. त्यातुन त्यांच्यात सच्चा संघटक, अनुयायी तथा दार्शनिक नेतृत्व दिसुन येते. कांशीरामजी यांची विचारधारा ही आंबेडकरवादाचा परिपाक होय. स्वतःसह समस्त उपेक्षित बहुजन समजाचे पृथ्थकरण करुन त्यातील हानिकारक असणाऱ्या बाबीना दुर सारुन सत्वर आंबेडकरवादाचे दर्शन त्यांनी घडविले. कांशीराम यांच्यावर आंबेडकरवादाचा प्रभाव जाणवतो. त्यांची विचारधारा आंबेडकरवादाच्या अनुषंगाने पोषित होत गेली. जोपर्यत बहुजन समाजाची वैचारिक बैठक परिपुर्ण होत नाही. तोपर्यत त्या समाजाचा राजकीय इतिहास निर्माण केला जाऊ शकत नाही असे ते म्हणतात. काशीरामजी यांचे विचारतत्व समजुन घेतांना त्यांचे समाज उत्थानाविषयीचे क्रांतिकारी विचार समजुन घेण्यास अग्रक्रम दयावा लागतो. त्यानंतर समाज उत्कर्षाच्या विचारासाठी आवश्यक असणाऱ्या राजकीय हस्तक्षेपाचा विचार हा उर्ध्वगामी ठरत असतो. शेवटी सत्ता परिवर्तन हे अंतिम ध्येय नसुन सामाजिक विषमता, गैरबराबरी नष्ट करुन जातीविरहीत समतामुलक समाजरचना निर्माण करणे. हे त्यांच्या चळवळीचे उद्देश होते.

प्रस्तुतच्या प्रकरणात बहुजन प्रेरणा केंद्र कांशीरामजीचे आर्थिक व शेतीविषयक धोरण, शिक्षणविषयक धोरण, कांशीरामजीचे संशोधन कार्य, त्यांचा वैचारिक दृष्टिकोन

राजकारणाविषयी, कॉंग्रेसविषयी, विरोधी पक्षाविषयी, समाजवादाविषयी, अल्पसंख्याकाविषयी, पक्षाविषयी, लोकशाहीविषयी, निवडणुकाविषयी, खनिजविषयी धोरण, चमचायुगा संदर्भात, विचार, समाजपरिवर्तनातून सर्व परिवर्तन होईल इत्यादी घटकांचा चिकित्सक अभ्यास केला जाईल.

**प्रकरण ७ उपसंहार व निष्कर्ष :** या प्रकरणामध्ये सदरच्या संशोधनातुन प्राप्त झालेले निष्कर्ष मांडले जातील व योग्य त्या ठिकाणी छायाचित्रे व आराखडे जोडले जातील. तसेच योग्य त्या शिफारशीही केल्या जातील. शेवटी परिशिष्टे आणि संदर्भ ग्रंथ यादी जोडली जाईल.

# संदर्भग्रंथ सूची

१) अमन कुमार - पॉलीटिकल पॉवर, प्रभाकर कुंटे नगर, मुंबई-१७, १० फेब्रुवारी २०१३

२) इंजेगावकर आनंद - बुध्द व आंबेडकर यांचे विश्वव्यापी तत्त्वज्ञान, सम्राटमधील लेख, १ सप्टेंबर २०१२.

३) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, एप्रिल-१९८२.

४) कांशीरामजी (संपादक)-बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, मार्च-१९८३.

५) कांशीरामजी - बामसेफ परिचय, हरिधनसिंग रोड, करोलबाग, नवी दिल्ली, १९८२.

६) कांशीरामजी (संपादक)-बहुजन नायक, वर्षे-१७, अंक-३०, ३७२, सम्यकनगर, नारी रोड, नागपूर, १९८१.

७) कांशीरामजी (संपादक)-बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, ७ डिसेंबर १९८०.

८) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, १४ जानेवारी १९८४.

९) कांशीरामजी (संपादक)- बहुजन साहित्य, वर्षे-१, अंक-१, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, डिसेंबर-१९८०.

१०) कांशीरामजी (संपादक)- बहुजन टाईम्स, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, ७ जुलै १९८४.

११) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, १० ऑगस्ट १९८०.

१२) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, १४ सप्टेंबर १९८०.

१३) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, १३ जाने. १९८२.

१४) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, १५ एप्रिल-१९८०.

१५) कांशीरामजी (संपादक)- बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, ४ एप्रिल-१९८२.

१६) कांशीरामजी (संपादक)- बहुजन संघटक, हरदयालसिंग रोड, करोलबाग, नवी दिल्ली, १४ एप्रिल १९७८.

१७) कांशीरामजी (संपादक)- बहुजन संघटक, हरदयालसिंग रोड, करोलबाग, नवी दिल्ली, २५ ०१ एप्रिल १९८२.

१८) कांशीरामजी (संपादक)-बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, ६ डिसेंबर १९८३.

१९) कांशीरामजी (संपादक)-बहुजन नायक, बहुजन मिडीया प्रेस नागपूर, १६ ऑक्टोंबर १९८३.

२०) कीर धनंजय- महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.

२१) कसबे रावसाहेब- डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे २००१.

२२) कांशीरामजी (संपादक)- बहुजन संघटक , हरदयालसिंग रोड, करोलबाग, नवी दिल्ली, १९८०.

२३) कठारे अनिल- फुले-शाहू-आंबेडकर, पुनम प्रकाशन, कंधार, प्रथमावृत्ती, १ एप्रिल २०११.

२४) कीर धनंजय- राजश्री शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८२.

२५) कसबे रावसाहेब (संपादक)- कांशीरामजी यांचे जीवनकार्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन पुणे विद्यापीठ, पुणे-७, ऑगस्ट २००७.

२६) खैरमोडे चांगदेव- डॉ. भिमरावजी आंबेडकर - खंड पहिला, सुगावा प्रकाशन पुणे, १९८८.

२७) गणवीर रत्नाकर- महाड समता संगर, रत्नमित्रा प्रकाशन भुसावळ, प्रथमावृत्ती १९८१.

२८) गुरु गोपाल- कांशीराम यांचा बहुजन वाद, समाजविज्ञान आकादमी सातारा, १९९१.

२९) गुरुव बाबुराव- व्यवस्था परिवर्तनाचा नवा आवाज कांशीराम, अभिजात ग्रंथ भांडार, जिल्हा सातारा, १९९४.

३०) गणवीर रत्नाकर- महाड समता सगर, रत्नमित्रा प्रकाशन भुसावळ, द्वितीयावृत्ती, १९८२.

३१) चंगोले पी. एस. - शाहू व कांशीराम, रविदास प्रकाशन नागपूर, १९९५.

३२) जाधव वसंत- आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती- १२ ऑक्टोंबर २००५.

३३) झेंडे बाळहरी- पॉलिटिकल पॉवर, प्रथमावृत्ती १२ ऑक्टोंबर २००५.

३४) डोळस अविनाश- सामाजिक चळवळी, आनंद पब्लिकेशन जळगांव, प्रथमावृती- २००२.

३५) तांबोळी एन. एस. - आधुनिक भारताचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, २००५.

३६) थोरात सी. पी. - पुणे करार, सुमेध प्रकाशन मुंढवा, पुणे, प्रथमावृत्ती २००८.

३७) थोरात सी. पी. - कांशीराम मनुवादापुढे आव्हान, शिवम् प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००५,

३८) धुळे शामसुंदर- बहुजन महानायक, वृत्तपत्रातील लेख, १५ मार्च २०११.

३९) निकम गौतम- आंबेडकरी ध्वजवाहक, बी.एस.पी. जयंती प्रकाशन, औरंगाबाद, १५ ऑक्टोंबर २००५.

४०) पाटील एन. डी. - महाराष्ट्रातील समाज सुधारण्याचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, विसावी आवृत्ती, एप्रिल २०१२.

४१) पाटील व्ही. बी. - १९ व्या शतकातील महाराष्ट्र, के. सागर प्रकाशन पुणे, २००८.

४२) पाटणकर भारत- महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष, लोकवाङ्मयगृह प्रभादेवी, मुंबई, द्वितीयावृत्ती १९९८.

४३) पवार जयसिंगराव- आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, सहावी आवृत्ती, २००५.

४४) पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २००१.

४५) फडके यशवंत दिनकर- २० व्या शतकातील महाराष्ट्र, श्रीविद्या प्रकाशन, शनिवारपेठ, पुणे-३०, खंड चौथा, प्रथमावृत्ती, १९९३.

४६) फडके यशवंत दिनकर- २० व्या शतकातील महाराष्ट्र, श्रीविद्या प्रकाशन, शनिवारपेठ, पुणे-३०, खंड तिसरा, द्वितीयावृत्ती, १९९४.

४७) फडके यशवंत दिनकर- २० व्या शतकातील महाराष्ट्र, के.सागर प्रकाशन, पुणे, खंड पहिला, द्वितीयावृत्ती, नोव्हेंबर २००५.

४८) फडके यशवंत दिनकर- २० व्या शतकातील महाराष्ट्र, के. सागर प्रकाशन, पुणे, खंड पाचवा, प्रथमावृत्ती, मे २००५.

| | |
|---|---|
| संशोधक विद्यार्थी | मार्गदर्शक |
| **प्रशांत पालकर** | **डॉ. यु.एस. सावंत** |